# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विराररयांचेकार्यालय
रामनगरसुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्रमांक - ११०/२०२५ दिनांक ०६/०३/२०२५

## प्रेसनोट

## हायवा ट्रक चोरी करणारे सराईत आरोपी पकडण्यात गुन्हे शाखा, कक्ष- १ काशिमीरा यांना यश.

-------ooooo-------

**हकिगत** :- दिनांक ०४.०३.२०२५ रोजी सायंकाळी ०६०० वा ते ०५/०३/२०२५ रोजी सकाळी ०६.०० वाजेच्या दरम्यान काका भोईर यांच्या कंपाउंड मधुन घोडब्ंदर मिरारोड पूर्व ता.जि ठाणे येथे फिर्यादी नामे - रोहन नबी दगडू पठाण वय-६२ वर्षे याचा ३८,००,०००/- रुपये किंमतीची हायव ट्रक एम.एच. ४८ सि.क्यु. ७२२९ हि कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी याचे संमतीशिवाय लबाडीच्या इराद्याने स्वतःच्या फायद्याकरीता चोरुन नेली म्हणुन काशिगाव पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर १०४/२०२५ भा.न्या.स कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

**गुन्ह्याची ऊकल** : सदर गुन्हे अनुषंगाने मा. वरिष्ठांना दिलेल्या यांनी दिलेल्या सुचने नुसार गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा कक्ष - १ काशिमीरा व्दारे सुरु करण्यात आला. कौशल्यपुर्ण तपासावरुन आरोपीत नामे - १) शमीम शहाबुद्दीन वय-३१ वर्षे रा.नुह, जिल्हा नुह, पोलीस ठाणे नुह, राज्य राजस्थान. २) मकसुद आमीन वय-३७ रा. ता. छांता, पोलीस ठाणे-शेरगढ, जिल्हा मथुरा, राज्य उत्तर प्रदेश, ३)मोहम्मद आरीफ रशीद वय-२४ वर्षे, रा. ता. नुह-मेवात, पोलीस ठाणे-नुह जिल्हा नुह, राज्य हरियाना यांचा पाठलाग करुन धरमपुर पोलीस ठाणे जि. वलसाड, राज्य- गुजरात येथुन गुन्हा घडल्याच्या २४ तासाच्या आत गुन्हयातील चोरीस गेलेला ३८,००,०००/- रुपये किंमतीचा हायवा ट्रक एम.एच. ४८ सि.क्यु. ७२२९ सह दिनांक ०५/०३/२०२५ रोजी ताब्यात घेण्यात आले असुन ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीत यांचा गुन्हेगारी पुर्वाभिलेख पडताळुन पाहता त्यांचेवर मथुरा राज्य उत्तरप्रदेश, अल्वर राज्य राजस्थान येथे दरोडा, वाहनचोरीचे गुन्हे नोंद आहेत.

उक्त आरोपी यांना पुढील कारवाई करीता काशिगाव पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर १०४/२०२५ भा.न्या.स कलम ३०३(२) प्रमाणे या गुन्हयात हजर करण्यात आले असुन गुन्हयाचा अधिक तपास सुरु आहे.

सदरची कामगिरी मा.श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त सो, मा.श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त सो, मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त गुन्हे, मा. श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष-१, काशिमीरा येथील पोनि. प्रमोद बडाख, पोउपनिरी / उमेश भागवत, पोउपनि./संदीप शिंदे, सफौ/ अशोक पाटील, पो.हवा./अविनाश गर्जे, पुष्पेंद्र थापा, संतोष लांडगे, मनोज चव्हाण, सचिन हुले, अश्विन पाटील पो.शि/प्रशांत विसपुते, गौरव बारी, सौरभ इंगळे, म.सु.ब./किरण असवले तसेच स.फौज. संतोष चव्हाण सायबर गुन्हे शाखा यांनी केली.


GOODS CARRIER